नियमित फौ. ख. क्र. ३२/२०१९
सरकार -वि.- राजेंद्र
नि.क्र. ६८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - यशवंता नत्थू इरदंडे,
वय ६२ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – उकळी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींना ओळखते त्यापैकी एक आज कोर्टात हजर आहे. दि.०५.११.२०१८ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला होता. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६९** देण्यात येते. पोलिसांनी माझ्या समक्ष कारवाई केली नव्हती. त्यावेळी मी शेतात जात असताना पोलीस घटनास्थळी लिखापडी करीत होते व त्यांनी माझी तिथे सही घेतली. आता मला दाखविलेला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला आठवत नाही. सहीला **नि.क्र.७०** देण्यात येते. आता मला दाखविलेला जप्ती पत्रक तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला आठवत नाही. सहीला **नि.क्र.७१** देण्यात येते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

**उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला मौजा सालेभट्टी शिवारातील रस्त्यावर पंचनामा करणेकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तिथे मारहाण झालेल्या ठिकाणाचा घटनास्थळ पंचनामा तयार केला व एक लोखंडी पोकळ पाईप जप्त केला. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला, मला वाचून दाखविला माझी सही घेतली. आता मला दाखविलेला

घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तोच आहे. तोच आहे. त्यास **नि.क्र.७२** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष लोखंडी पाईप जप्त केला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी जप्ती पत्रक मला वाचून दाखविला व माझी सही घेतली. आता मला दाखविलेला जप्ती पत्रक तोच आहे. त्यास **नि.क्र.७३** देण्यात येते. पोलिसांनी माझे बयान घेतले नव्हते. आता साक्षीदाराला त्याच्या बयानातील अधोरेखीत भाग वाचून दाखविण्यात आला. तसे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बयानातील अधोरेखीत भाग मी पोलिसांना सांगितला होता.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री भोंगे यांचे मार्फत**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील असल्यामुळे पोलीस माझ्या ओळखीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी येण्याआधी पोलिसांनी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार करुन ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस माझ्या ओळखीचे असल्यामुळे सुचनापत्र, पंचनामा व जप्ती पत्रक यावर एकाचवेळी सह्या केल्या. आरोपीची शेती सालेभट्टीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा व जप्ती पत्रक आधीच तयार केला असल्यामुळे त्या मध्ये काय लिहीले आहे ते मला माहीत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांच्या सांगण्यावरुन सह्या केल्या.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - ०९.०९.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.